**जोडपत्र ३**

## कोविड -१९ व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय निर्देश

सदर राष्ट्रीय निर्देशांची अंमलबजावणी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदींचे द्वारे करणे अनिवार्य आवश्यक असून दोषीविरुद्ध दंडात्मक कार्यवाहीचे प्रावधान आहे .

**सार्वजनिक स्थळे :-**

1. सर्व सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी चेहऱ्यावर रुमाल किंवा मास्क घालणे अनिवार्य आहे.
2. सार्वजनिक ठिकाणी, कामाची ठिकाणे आणि वाहतुकीचे साधनांमध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सामाजिक अंतर राखल्या जाईल हे सुनिश्चित करणे बंधनकारक आहे .
3. सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई असेल.
4. विवाह आणि अंत्यसंस्कार यासारख्या गर्दीचे कार्यक्रम याबाबत जिल्हाधिकारी निर्देश देतील .
5. सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास दंड व शिक्षा अथवा दोन्हीही करणेत येईल.
6. दारू,सर्व प्रकारचे मद्य , गुटखा, तंबाखू इत्यादींच्या विक्री बंद असेल.

**कामाचे ठिकाण :-**

1. सर्व कामाच्या ठिकाणी शरीराचे तापमान तपासणीसाठी (thermal screening) पुरेशी व्यवस्था असेल आणि योग्य त्या ठिकाणी सॅनिटायझर्स उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.
2. कामाची ठिकाणे शिफ्ट दरम्यान एक तासाचे अंतर ठेवावे आणि दुपारच्या जेवणाच्या विश्रांतीला योग्य ते सामाजिक अंतर ठेवावे .
3. 65 वर्षापेक्षा जास्त वयाची व्यक्ती, सह-रुग्णांना आणि 5 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांच्या पालकांना घरातून काम करण्यास प्रोत्साहित करावे.
4. खासगी व सार्वजनिक अशा सर्व कर्मचाऱ्यांना आरोग्य सेतू app चा वापर करण्यास सांगावे .
5. सर्व संस्था त्यांची कामाची जागा ,शिफ्ट दरम्यान स्वच्छ करतील.
6. मोठ्या बैठका घेण्यास मनाई आहे.

**उत्पादन करणारे कारखाने /संस्था**

1. सामान्य पृष्ठभागाची वारंवार साफसफाई करणे आणि हात धुणे अनिवार्य केले जाईल.
2. शिफ्ट बदलामध्ये मध्ये अंतर ठेवावे आणि कॅन्टीनमध्ये जेवणासाठी गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच योग्य सामाजिक अंतर ठेवावे
3. स्वच्छतेच्या योग्य पद्धतींबाबत योग्य त्या सूचना आणि सखोल प्रशिक्षण घेण्यात यावे.

**(सुरज दि.मांढरे, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**